दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २१७ || रविवार २१ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# मद्यपी धाकट्याने थोरल्याचा काठीने वार करून केला खून

**न्याहारवानी/डोंगरगाव येथील घटना**

**पालांदूर पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल**

दैनिक सूर्योदय

खूशाल भूरे लाखनी:- मृतक तेजेंद्र नागलवाडे व जखमी प्रवीण नागलवाडे दोघेही सख्खे भाऊ असून मद्यपी होते. दारूचे नशेत दोघेही भांडण करीत असत. राहते घरी दोघांत भांडणं झाल्याने प्रवीण ने तेजेंदे ला लाकडी काठी व लोखंडी पावशीने डोके, गालावर मारहाण करून गंभीर जखमी केले. उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाल्याची घटना शुक्रवार(ता.१९जुलै) सकाळी ११:३० वाजता दरम्यान घडली. पोलिस पाटील लेकराम नागलवाडे यांचे फिर्यादी वरून पालांदूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मृतकाचे नाव तेजेंद्र कृष्णा नागलवाडे(३०) तर आरोपी व जखमी चे नाव प्रवीण कृष्णा नागलवाडे(२८) रा. न्याहारवानी/डोंगरगाव, तालुका लाखनी असे आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली असून तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील राऊत करीत आहेत. आरोपी ही जखमी असल्याने त्याचेवर जिल्हा सामान्य रुग्णालय भंडारा येथे उपचार सुरू आहे. दोघेही अविवाहित आहेत.



प्रवीण नागलवाडे हा ६ महिन्यापूर्वी कामाचे शोधार्थ बाहेरगावी गेला होता. ३ दिवसापूर्वीच तो गावी आला होता. या आधी त्याचा मोठा भाऊ तेजेंद्र हा दारूच्या नशेत भांडण करीत असताना त्याच्या मोठ्या वडिलांनी हटकले असता त्याला ढकल ढुकल करून खाली पाडल्याने डोके फुटले होते. प्रवीण आणि तेजेंद्र दोघेही मद्यपी होते. दारू पिल्यानंतर झगडा भांडण करणे ही नित्याचीच बाब असल्याने गावकरीही त्यांचेकडे दुर्लक्ष करीत असत. शुक्रवारी सकाळचे सुमारास राहते घरी दोघांतही भांडण झाले. रागाचे भरात धाकट्या प्रवीण ने थोरला तेजेंद्र ला काठी व लोखंडी पावशी डोके व गालावर मारून गंभीर जखमी केले व घरीच एका खोलीत सोफ्याच्या फोमवर गंभीर जखमी अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला ठेऊन गावातील भारत माता चौकातील जुन्या घराजवळ प्रवीण रक्ताने माखलेल्या अवस्थेत पोलिस पाटील लेकराम नागलवाडे यास दिसून आल्याने विचारपूस केली असता काही न बोलता तो नवीन घराकडे जाण्यास निघाला. पोलिस पाटील व इतर २ त्याच्या मागे-मागे गेले असता सदर घटना उघडकीस आली.

पोलिस पाटील लेकराम नागलवाडे यांनी पालांदूर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील राऊत यांना तसेच १०८ क्रमांकावर भ्रमणध्वनीव्दारे माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील राऊत, सहाय्यक फौजदार कचरू शेंडे, पोलिस शिपाई नाविद पठाण, महिला पोलिस शिपाई ब्राह्मणकर यांचेसह घटनास्थळी पोहचले. सपोनि राऊत यांनी घटनेची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली. तसेच १०८ ही आली. पोलिसांनी गंभीर जखमी तेजेंद्र व प्रवीण ला रुग्णवाहिकेत उपचारासाठी नेत असता प्रवीण ने तेजेंद्र चा गळा दाबण्याचा प्रयत्न केल्याने उपस्थित पोलिसांनी त्याला बाजूला केले. उपचारासाठी नेत असताना वाटेतच तेजेंद्र चा मृत्यू झाला. सर्व सोपस्कार पार पाडून मृतदेह उत्तरीय परिक्षणासाठी सामान्य रुग्णालय भंडारा चे शवागारात ठेवण्यात आला. जिल्हा पोलिस अधीक्षक लोहित मतानी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक सुशांत सिंग यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिस पाटील लेकराम नागलवाडे यांचे फिर्यादी वरून पालांदूर पोलिसांनी प्रवीण नागलवाडे याचे विरुद्ध अपराध क्रमांक ११९/२०२४ कलम १०३(१) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले. पण तोही जखमी असल्याने उपचारासाठी सामान्य रुग्णालय भंडारा येथे पाठविण्यात आले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील राऊत करीत आहेत. मृतकाचे कुटुंबात म्हातारी आई व मतिमंद बहीण आहे.

# वाहेगाव येथे अमरधाम स्मशानभुमीत अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला

गंगापूर प्रतिनिधी २० जुलै रोजी वाहेगाव येथील ऋषिकेश सोपानराव मनाळ या युवकाने वाढदिवसाच्या निमित्ताने वाहेगाव येथिल स्मशानभूमी येथे वाढदिवस साजरा करण्यात आला वाहेगाव येथील अमरधाम स्मशानभूमी येथे सकाळी १० वाजेपासून १ वाजेपर्यन्त वृक्ष लागवड , सुशोभीकरण व स्वच्छता करत हा आनंद उत्सव साजरा केला आहे



. या युवकाचे सर्वत्र कौतुक होत आहे यावेळी श्री वाल्मिक शिरसाठ सामाजिक कार्यकर्ते व श्री दादासाहेब तायडे झाडात मित्र शोधणारा कार्यकर्ता श्री ह . भ .प . दौलत मनाळ . (महाराज ) यांच्या उपस्थित हा सोहळा संपन्न झाला आहे . यावेळी पंचक्रोशितील मित्रपरीवार देखिल उपस्थित होता .आकाश लेकुरवाळे अनंता भडके लक्ष्मण गोरे कल्याण मनाळ विजय हिवाळे साईनाथ मनाळ . अँड. रामनाथ पारखे शिवश्री प्रकाश पारखे आकाश पारखे भरत मनाळ प्रल्हाद भडके दादाभाऊ मनाळ विष्णु मनाळ दादा तगरे सुदाम दारुटे राहुल आंन्दुरे म्हसु पारखे

. नितिन मनाळ आमोल पारखे चांगदेव मनाळ कल्याण हिवाळे मंजिद पठाण शुभाष तगरे शिवाजी दारुटे योगेश पेहरकर सुभाष हिवाळे काका कुलकर्णी भाऊसाहेब येवले बद्रीनाथ मनाळ कुष्णा हिवाळे गोविद पारखे किरण मनाळ आमोल शिन्दे ज्ञानेश्वर अमृते यांच्या उपस्थित हा कार्यक्रम संपन्न झाला आहे या सर्वांनी स्मशानभुमी स्वच्छ करुन रंगुन बाधकाम करुन व झाडे लाऊन एक सामाजिक उपक्रम राबवला आहे .

# एकही महिला लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहणार नाही – सुदर्शन राऊत

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर भंडारा एकही महिला लाडकी बहीण योजना पासून वंचित राहणार नाही जास्तीत जास्त महिलांनी योजनेत सहभाग घेण्यासाठी जनजागृती करा त्यांना घनसावंगी तालुक्यातील मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना या संदर्भात प्रत्येक गावातील वय गट २१ ते ६५ महिला बहिणींना या योजनेने संदर्भात विधानसभेतील भारतीय जनता पार्टीचे सक्रिय कार्यकर्ते आयुष्यमान भारत तालुका अध्यक्ष सुदर्शन राऊत यांनी या योजनेचे संदर्भात शासनाने मांडलेले अर्थसंकल्प विषय महिलांना मार्गदर्शन करणे विधानसभेतील प्रत्येक गावात स्वतः मार्गदर्शन केले ऑनलाईन आयुर्वेद प्रतिक्रिया पूर्ण करत प्रत्येक गावात जाऊन जनजागृती करावी महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्र मध्ये मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना घोषित केली आहे या सर्व अंगणवाडी



सेविका मदतीस त्यांना सुचित करण्यात आले वंचित पासून वंचित राहू नये यासाठी भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते आयुष्यमान भारत तालुका अध्यक्ष सुदर्शन राऊत यांनी प्रत्येक गावात जनजागृती करावी यामध्ये पंधराशे रुपये महिलांना खात्यामध्ये दर महिन्याला जमा होणार चालू झाली आहे तर सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत जाणार आहेत अर्थसंकल्पात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या शिक्षण व परीक्षा फलकात शंभर टक्के सवलत देण्याच्या महत्वपूर्ण योजनेची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना करतात जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी ही प्रत्येक गावात जाऊन शिबिर राबवत ऑनलाइन आवेदन प्रतिक्रिया पूर्ण करत आहोत या योजना संदर्भात काही अडचण असल्यास माझ्याशी संपर्क ९८५१६३२७७७ करा सुदर्शन राऊत आयुष्यमान भारत तालुका अध्यक्ष

# जुन्या भांडणाच्या कारणातून बळीरामपूर येथे २३ वर्षीय युवकाचा खून

नांदेड(प्रतिनिधी)-काल सायंकाळी काही जणांनी जुन्या भांडणाच्या कारणातून एका २३ वर्षीय युवकचा खून केल्याचा प्रकार बळीरामपुर भागात घडला आहे. या बाबत वृत्तलिहिपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली नव्हती.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सलग तिसऱ्या दिवशी तिसरा खून झाला आहे.

खात्रीलायक सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गौतमीनगर बळीरामपुर भागात राहणारे व अमोल रामेश्वर लांडगे(२३) यास काल दि.२४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेच्यासुमारास काही जणांनी मारहाण करून

त्याचा खून केला आहे. या बाबत पोलीस ठाण्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता अद्याप प्रक्रिया पुर्ण झालेली नाही असे सांगितले. आमच्या सुत्रांनी सांगितल्याप्रमाणे अमोल लांडगेसोबत जुन्या भांडणाच्या कारणावरून हल्ला झाला आणि त्याचा खून करण्यात आला आहे.

# सुनेने केली सासुची १७ लाख ८६ हजारांची फसवणूक

नांदेड(प्रतिनिधी)-एका आईने आपल्या सुनबाई विरुध्द दिलेल्या अर्जाची चौकशी झाल्यानंतर त्याप्रकरणी सुनबाईविरुध्द ठकबाजी करणे, खोटे कागदपत्र बनविणे, ते खरे आहेत असे भासवून त्याचा दुरूपयोग करणे अशा सदराखांली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वडेपुरी ता.लोहा येथील महानंद बापुराव चित्ते यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर लोहा या न्यायालयात त्यांच्या सुनबाई दिक्षा सिध्दार्थ चित्ते यांनी काही सरकारी कर्मचारी आणि एजंट/ दलाल यांनी मिळून महानंदा या सिध्दार्थ चित्तेच्या आई असतांना बनावट आणि खोटी कागदपत्रे तयार करून

ती न्यायालयात खरी आहेत असे दाखवले आणि न्यायालयाकडून आपल्या मर्जीचा आदेश करून घेतला. त्यामुळे न्यायालयाची सुध्दा फसवणूक झाली. या संदर्भाने महानंदा चित्ते यांनी ३० ऑगस्ट २०२१ रोजी पोलीस ठाणे लोहा येथे अर्ज दिला होता. त्यात त्यांचा पूत्र सिध्दार्थ चित्ते हा शासकीय तंत्रनिकेतन हिंगोली येथे कार्यरत असतांना मरण पावला होता आणि त्याच्या वारसांसाठी ५३ लाख ६० हजार रुपये मिळाले होते.

त्यात महानंदाबाईचा हिस्सा १७ लाख ८६ हजार ६६६ रुपये होता. या अर्जाची चौकशी करून चौकशीमध्ये महानंदा यांनी दिलेल्या सर्व मुद्यांना पुष्ठी मिळाल्यानंतर लोहा पोलीसांनी नवीन अर्ज घेवून भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे गुन्हा क्रमांक २५३/ २०२४ दाखल केला आहे. या प्रकरणातील फसवणूक करणाऱ्या सुनबाई सध्या किनवट येथे राहतात अशी नोंद प्राथमिकीमध्ये आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरिक्षक रोडे हे करीत आहेत.

# लाचखोर दुय्यम निबंधक न्यायालयीन कोठडीत अर्थात तुरूंगात

नांदेड(प्रतिनिधी)-पाच दिवस पोलीस कोठडी संपल्यानंतर ८६ हजारांची लाच घेणाऱ्या हदगाव येथील दुय्यम निबंधकाला विशेष न्यायाधीश सी.व्ही.मराठे यांनी पोलीसांच्या विनंतीप्रमाणे न्यायालयीन कोठडीत घेतले आहे. त्यामुळे आजची रात्र दुय्यम निबंधकाला तुरूंगात काढावी लागेल.

हदगाव येथे एका जमीनीची रजिस्ट्री करण्यासाठी तक्रारदाराकडून १ लाख ९९ हजार रुपये लाच मागण्यात आली पण त्या लाचेमध्ये १ लाख २० हजार रुपये हे नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या फिसचे होते. म्हणजे ८६ हजार लाच होती. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने त्यांना १३ जुलै रोजी अटक केली. न्यायाधीश मराठे यांनी १५ जुलैपर्यंत, दोन दिवस पोलीस कोठडीत पाठविले. पोलीस कोठडी संपल्यानंतर वाढीव पोलीस कोठडीच मागणी झाली. त्यात न्यायालयाने १५ जुलै ते १८ जुलै अशी तीन दिवस पोलीस कोठडी वाढून दिली.

पोलीसांनी सादर केलेल्या माहितीप्रमाणे उत्तरवारच्या शिक्षीका पत्नी यांचे संयुक्त बँक अकाऊंट तपासणी करण्यात आले आहे. पोलीस कोठडी मागतांना पोलीसांनी या बँक खात्यात ४० लाख रुपये असल्याचा मुद्दा मांडला होता. आज आमचा तपास पुर्ण झाला आहे असे नमुद करून लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरिक्षक प्रिती जाधव यांनी उत्तरवारला न्यायालयीन कोठडीत घेण्याची विनंती केली. त्यानुसार न्यायाधीश मराठे यांनी दुय्यम निबंधक बालाजी शंकर उत्तरवार (५६) वर्ष यास न्यायालयीन कोठडीत घेतले. अर्थात तुरूंगात पाठविले. आज बालाजी उत्तरवारच्यावतीने जामीन अर्ज दाखल झाला काय?. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने यावर आपले म्हणणे सादर केले काय? याबद्दल काही माहिती प्राप्त झाली नाही. या प्रकरणात दुय्यम निबंधक बालाजी उत्तरवारच्यावतीने प्रसिध्दी विधिज्ञ ऍड.अमित डोईफोडे हे सादरीकरण करत आहेत.

संपादकीय

## घरीदारी रंगू लागली.

'आमचे येथे श्रीकृपेकरून अमुक अमुक यांचे सुपुत्र आणि अमुक अमुक यांची सुकन्या यांचा शरीरसंबंध करण्याचे योजिले आहे. तरी मांडवशोभेसाठी आपण अवश्य यावे' अशी कोणे एके काळची आपल्या वाडवडिलांच्या लग्नाची इतकी थेट पत्रिका धनाजीरावांच्या डोळ्यासमोरून हलत नव्हती. शरीरसंबंध मांडवशोभा छ्या हे म्हणजे फारच झाले. लग्न म्हणजे स्वर्गात बांधल्या जाणाऱ्या पवित्र गाठी, त्या पृथ्वीवर येऊन पक्क्या करायच्या असतात. त्याआधी दोन्ही घराणी किती तोलामोलाची आहेत, हे पाहायचे असते. लग्न म्हणजे दागदागिने, कपडेलत्ते, मेजवान्या, भेटवस्तू, नाचगाणी, भेटीगाठी हेच त्यांना माहीत होते. आपल्या आजोबा-पणजोबांच्या जीवनात जरा म्हणून मनोरंजन नव्हते, म्हणून त्यांनी अशा थेट आणि रूक्ष पत्रिका लिहून लग्ने उरकली. आपण आपल्या धाकट्याच्या बाबतीत मात्र तसे अजिबात करायचे नाही, असे धनाजीरावांनी ठरवून टाकले होते. त्याला कारणही तसेच होते. हे कारण काय आणि हे धनाजीराव कोण म्हणून विचारता? अहो तेच ते. कोणे एके काळच्या आटपाट नगरातले. नाही समजले? पहिल्यापासून नीटच सांगायला हवे आहे म्हणता? चला तर मग काय झाले की पूर्वीच्या कहाण्यामध्ये असते तसे एक आटपाट नगर होते. तिथे धनाजीराव आणि सुंदराबाई हे जोडपे राहत होते. आणि हो, या आटपाट नगरात धनाजीरावांच्या गावीही नसलेले एक नानाजीपंतही होते. पण आपणही त्यांची फार दखल घेण्याची गरज नाही. तर असो, गाठीला बक्कळ पैसा जोडलेल्या धनाजीरावांना गावात चांगलाच मान होता. त्यांचे कुटुंबही खाऊनपिऊन सुखी होते. धनाजीरावांच्या दोन गुणी मुलांचे विवाह झाले होते आणि त्यांच्या कुटुंबात एक सुशील सून आणि जावयाची भर पडली होती. आता त्यांच्या शेंडेफळाचे लग्न होऊ घातले होते. धनाजीरावांच्या घरातले हे शेवटचे कार्य. त्यामुळे सगळ्या पंचक्रोशीत त्याची चर्चा झाली पाहिजे, 'आजवर असा विवाह पाहिला नाही,' असे लोकांनी म्हटले पाहिजे असे धनाजीरावांना वाटत होते. शिवाय त्यांच्या असेही लक्षात आले की त्यांच्याकडे असलेल्या संपत्तीच्या, त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत आटपाट नगरात महागाई अगदीच किरकोळ होती. त्यामुळे मग धनाजीराव आणि सुंदराबाई यांनी हा समारंभ झोकात, अगदी हात सैल सोडून करायचे ठरवले.

गावोगावी आमंत्रणे पाठवायची होती. धनाजीरावांचा मित्रपरिवार तसा मोठा आणि वेगवेगळ्या थरांमधला. कुणाला चढवायचे नाही आणि कुणाला उतरवायचे नाही म्हणून ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणे पत्रिका छापायचे आणि पाठवायचे ठरले. आपल्या घरातून जाणारी लग्नपत्रिका पुढची पन्नास वर्षे लोकांनी जपून ठेवली पाहिजे, असे धनाजीराव आणि सुंदराबाई यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी पत्रिकाही अशा सोन्याचांदीचा वर्ख ल्यालेल्या छापल्या की त्या ज्यांना ज्यांना मिळाल्या त्या बघून सगळ्यांनी आ वासला. ज्यांना पत्रिका गेल्या नाहीत, त्यांना म्हणजे नानाजीपंतांना आपोआपच समजले की आपण किती मोठे व्हायला हवे, तर धनाजीरावांच्या घरून आमंत्रण यायला हवे एवढे. त्यामुळे ज्यांना धनाजीरावांकडून पत्रिका आली असे लोक आणि ज्यांना आली नाही असे लोक अशी आपोआपच जगाची विभागणी झाली. तर असो. लग्न समारंभ एकाच दिवशी झाला तर तो कशाला कुणाच्या लक्षात राहील, असे धनाजीरावांना वाटत होते. लग्न मुहूर्तावर लावायचे असल्यामुळे ते एकदाच लावावे लागते, पण साखरपुड्याचे तसे काही नसते अशी पळवाट गुरुजींनी काढून दिल्यावर सगळे कसे सोपे होऊन गेले. एकदा मुलाच्या घरी, एकदा मुलीच्या घरी, एकदा शेतातल्या बंगल्यावर असा तीन तीन वेळा साखरपुडा झाला. अशीच वेगवेगळ्या ठिकाणी तीन तीन वेळा व्याहीभोजने झाली. त्याशिवाय संगीत समारंभ, मेंदी समारंभ, सीमान्तपूजन आणि मुख्य लग्न समारंभ आणि त्यानंतरचा स्वागत समारंभ अबब या सगळ्या कार्यक्रमांमधल्या वधूवरांच्याच नाही, तर इतरांच्याही पोशाखांची, दागदागिन्यांची, जेवणावळींमधल्या पदार्थांची यादी ऐकूनच नानाजीपंतांची दमछाक होत होती. तीन साखरपुडे, तीन व्याहीभोजने आणि प्रत्यक्ष लग्न समारंभ यांत वेगवेगळे पेहराव करायचे, त्यावर वेगवेगळे दागिने घालायचे म्हणजे वऱ्हाडी मंडळींनीच धनाजीरावांच्या चिरंजीवांच्या विवाहासाठी किती बरे खर्च केला असेल, अशी चर्चा नानाजीपंतांच्या घरीदारी रंगू लागली.

नानाजीपंतांना वाटू लागले, लग्न असावे तर असे

# कवी बसवंत थरकार यांच्या ''नवी पहाट ''कविता संग्रहास उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कारने सन्मानीत.

गुहागर (संतोष आग्रे ): राजयुवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व राजयुवा प्रकाशन पुणे या संस्थेतर्फे कवी बसवंत थरकार यांच्या ''नवी पहाट'' या पहिल्याच कविता संग्रहास उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजयुवा प्रतिष्ठान व राजयुवा प्रकाशन संस्थेतर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन मालधक्का चौक पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात जेष्ठ साहित्यिक शरदच्चंद्र काकडे-देशमुख यांच्या हस्ते कवी बसवंत थरकार यांना गौरविण्यात आले. आयोजकांना परीक्षणासाठी एकूण सत्तर कवितासंग्रह प्राप्त झाले होते. त्यातून चार कवितासंग्रहांची उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती, त्या मध्ये ''नवी पहाट'' या कविता संग्रहाचा समावेश होता.

पुरस्कार वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध गीतकार संजय वेदपाठक तर उद्घाटक म्हणून प्रा. डॉ शैलेंद्र भणगे, जेष्ठ साहित्यिका ललिता श्रीपाल सबनीस, निर्माता व सिने अभिनेता रविंद्र बाराथे, वन विभाग लेखापाल,लक्ष्मण शिंदे, जेष्ठ साहित्यिक शरदच्चंद्र काकडे-देशमुख आदी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील सुमारे पंधरा साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण मित्र वगैरेंचा आकर्षक सन्मानचिन्ह, पदक, सन्मानपत्र व शाल देऊन गौरविण्यात आले.

साहित्य, कला, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात देत असलेले योगदान अनमोल असून विशेषतः साहित्य क्षेत्रातील गुणवत्तेबद्दल आदर आणि गुणांची कदर करुन साहित्यिकांच्या साहित्य कृतीस पुरस्कार प्रदान करत असल्याचे तसेच या मुळे संयोजकांना विशेष आनंद होत आहे. हा पुरस्कार म्हणजे समाजाच्या हितासाठी निःस्वार्थ पुणे करत असलेल्या प्रतिभाशाली साहित्यिक कार्याचा सन्मान आहे तसेच साहित्यिक कार्याचा व साहित्य कृतीचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान केला जात असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

व्यासपीठावरील मान्यवर साहित्यिकांनी आयोजक गौरव पुंडे, योगेश हरणे यांच्याया उपक्रमाचे तोंड भरुन कौतुक करुन या पुढे देखील त्यांच्या कार्यक्रमासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.ङ्ग कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात सुमारे पन्नास निमंत्रित कवींसाठी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कवी बसवंत थरकार यांनी सादर केलेल्या ''माझं मला'' या कवितेला काव्य रसिकांची उत्कृष्ट दाद मिळाली. त्या बद्दल त्यांना आकर्षक स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिध्देश उतेकर व सौ रोहिणी डाके तसेच गौरव पुंडे यांनी तर कवी योगेश हरणे यांनी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप केला.




# पांगारी तर्फे वेळंब येथील वृद्ध महिला सुवर्णा शांताराम खांबे यांच्या राहत्या घराचे पूर्णतः नुकसान

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी केली पाहणी

प्राथमिक उपचारासाठी केली आर्थिक मदत, मोदी आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळण्यासाठी मनसे प्रयत्नशील

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यात सतत पडत असणाऱ्या पावसाने वित्तहानी होत आहे. पांगारी तर्फे वेळंब येथील सुवर्णा शांताराम खांबे यांच्या राहत्या घराचे पूर्णतः नुकसान झाले असून सुवर्णा यांच्या पायाला दुखापत झाली आहे. तर घराचे नुकसान १ लाख रुपये झाल्याचे पंचनाम्यात म्हटले आहे. या घराची शनिवारी मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर, तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर, विभाग अध्यक्ष नितीन कारकर यांनी पाहणी करून सदर वृद्ध महिलेची विचारपूस केली.या घरामध्ये सदर महिला एकटीच राहत होती. मध्यरात्री अचानक कोसळलेल्या घराच्या भिंतीचे दगड अंगावर पडून त्यांच्या पायाला दुखापत झाली आहे. यावेळी बोलताना मनसे गुहागर तालुकाध्यक्ष सुनील हळदणकर यांनी सांगितले की, नुकसानग्रस्त घरातील या वृद्ध महिलेला तातडीने रुग्णालयात घेऊन जाणे गरजेचे होते. परंतु प्रशासनाकडून हे झाले नाही. फक्त डॉक्टरांना पाठवून प्राथमिक उपचार करण्यात आले. या संदर्भात सन्मानीय तहसीलदार यांच्याशी माझं बोलणं झालं असून तहसीलदार साहेब या संदर्भात येथील तलाठी व ग्रामसेवक यांना या वृद्ध महिलेची भेट घेऊन तातडीने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देणार आहेत. असे सांगितले. या वृद्ध महिलेला मनसेकडून प्राथमिक आर्थिक मदत करण्यात आली आहे. यापुढे या वृद्ध महिलेसाठी शासनाकडून मोदी आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळण्यासाठी मनसे प्रयत्नशील राहील असेही सांगितले. सध्या ही महिला त्यांच्या नातेवाईकांच्या घरी राहत आहे. त्यांच्या नातेवाईकांशी मनसे कार्यकर्त्यांनी भेट घेतली असून त्यांना लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासन मनसे तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांनी दिला आहे. यावेळी उपजिल्हा अध्यक्ष विनोद जानवळकर तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर विभाग अध्यक्ष नितीन कारकर गंगाराम खाबेङ्गसदाशिव खांबेङ्गसुनंदा सदाशिव खांबेङ्गसुलचना दत्ताराम खांबेङ्गरुचिता महेश खांबे आदी.उपस्थित होते.



# देशात मक्याचा खडखडाट, प्रतिकिलो ३० रुपयांवर;

## कुक्कुटपालन व्यवसायावर परिणाम

पुणे : देशभरात गेल्या वर्षी कमी पर्जन्यवृष्टी झाल्यामुळे मका उत्पादनात घट झाली आहे. दुसरीकडे कुक्कुटपालन, पशुखाद्य, प्रक्रिया उद्योग, कापड उद्योग आणि इथेनॉल निर्मितीसाठी मक्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे बाजारात मक्याचा खडखडाट आहे. मकाटंचाईचा मोठा फटका कुक्कुटपालन व्यवसायाला बसत आहे.



देशात दर वर्षी सरासरी ३५० ते ३८० लाख टन मक्याचे उत्पादन होते. तर देशांतर्गत मक्याची मागणी सुमारे ४०० लाख टन आहे. त्यामुळे दर वर्षी मक्याचा काही प्रमाणात तुटवडा असतोच. खरीप आणि रब्बी हे मका उत्पादनाचे दोन प्रमुख हंगाम असले, तरीही देशाच्या कोणत्या ना कोणत्या राज्यात जवळपास वर्षभर मक्याची लागवड होते. त्यामुळे मागणी पुरवठ्याची साखळी वर्षभर सुरू असते. पावसाळ्याच्या पहिल्या टप्प्यात दर वर्षी बिहारमधील मका देशभराची गरज पूर्ण करतो. बिहार सरकारने जैवइंधनाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे बिहारच्या मक्याला बिहारमधूनच मागणी वाढली आहे. साधारण १७ –१८ रुपये प्रतिकिलो दराने मिळणारा मका बिहारमध्येच २२ ते २३ रुपयांनी विकला जात आहे. प्रामुख्याने इथेनॉल किंवा जैव इंधनासाठी मक्याचा वापर वाढल्याचा थेट फटका कुक्कुटपालन व्यवसायाला बसत आहे.

राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना मक्याला प्रतिकिलो २२ ते २८ रुपयांपर्यंतचा दर मिळत आहे, तर कुक्कुटपालकांना सध्या बाजारातून २८ ते ३० रुपये किलो दराने मका विकत घ्यावा लागत आहे. कोंबड्यांच्या एकूण खाद्यात मक्याचा वापर ६० टक्क्यांपर्यंत असतो. अडचणीच्या काळात मक्याला पर्याय म्हणून काही प्रमाणात कमी दर्जाच्या तांदळाचा वापर केला जातो. यंदा अपेक्षित प्रमाणात तांदूळही मिळत नाही. कोंबड्याच्या खाद्याच्या दरात २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तितकी वाढ चिकन आणि अंड्यांच्या विक्री दरात झालेली नाही. त्यामुळे कुक्कुटपालन व्यवसाय अडचणीत आला आहे. महाराष्ट्र राज्य पोल्ट्री फॉर्मर्स ॲण्ड ब्रीडर्स असोसिएशनने केंद्र सरकारकडे बाजारातील मक्याची टंचाई दूर करण्यासाठी आयात कर हटवून मका आयात करण्याची मागणी केली आहे.

मक्याच्या दरवाढीमुळे कोंबडी खाद्याच्या खर्चात २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. पुढे श्रावण महिना असल्यामुळे चिकन, अंड्याच्या दरात पडझड होणार आहे. कुक्कुटपालकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने आयात कर हटवून मक्याच्या आयातीला परवानगी द्यावी, तसेच अतिरिक्त आणि कमी दर्जाचा तांदूळ उपलब्ध करून द्यावा. संजय नळगीरकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पोल्ट्री फॉर्मर्स ॲण्ड ब्रीडर्स असोसिएशन

## कौतुकास पात्र कृती

इतरांनी कसे वागावे यावर उच्चपदस्थांनी प्रवचने झोडण्यास अल्पकर्तृत्व पुरते. त्याचे दिवसागणिक अनेक नमुने आसपास पाहावयास मिळतील. आव्हान असते स्वत:च्या क्षेत्रातील कर्तव्यच्युतीची दखल घेण्याचे आणि उच्चपदस्थांस प्रिय; पण अयोग्य कृती दाखवून देण्याचे. हे आव्हान सर्वोच्च न्यायालय अलीकडे पेलताना दिसते ही मोठी दिलासा देणारी बाब. गेल्या आठवड्याच्या अखेरीस सर्वोच्च न्यायालयाच्या दोन स्वतंत्र पीठांच्या कृतीतून हा दिलासा मिळतो. व्यवस्थेविषयी बरे काही बोलावे, सांगावे असे अनुभव अधिकाधिक दुर्मीळ होत असताना सर्वोच्च न्यायालयाच्या या कृतींची दखल घेणे आणि तिचा प्रसार करणे आवश्यक ठरते.

यातील पहिली घटना आहे ती न्या. अभय ओक आणि न्या. उज्जल भुयान यांनी पटणा उच्च न्यायालयास खडसावले त्याची. या न्यायालयाने एका खून प्रकरणातील आरोपीस जामीन तर दिला; पण त्याच्या जामिनावरील मुक्तता सहा महिन्यांनी होईल अशी अट घातली. खरे तर यातील विरोधाभास लक्षात येण्यास न्यायपंडित असण्याचीही गरज नाही. तरीही आपल्या निर्णयातील खोट या न्यायाधीश महोदयांस लक्षात आली नाही. परिणामी सर्वोच्च न्यायालयाकडून बोलणी खाऊन घेण्याची वेळ उच्च न्यायाधीशांनी स्वत:वर आणली. ‘‘हा काय प्रकार आहे? काही न्यायाधीशांकडून सहा महिने वा वर्षभर जामीन नाकारण्याचे प्रकार घडत असताना त्यात आता हा नवा नमुना’’ असे म्हणत न्या. ओक यांनी या ‘‘आभासी जामीन’’ प्रकाराबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. ‘आरोपी जामिनास पात्र आहे; पण तो त्यास सहा महिन्यांनी मिळेल’ हे असे सांगणे कोणत्या कायद्यात बसते असा न्या. ओक यांच्या म्हणण्याचा अर्थ. पाटणा उच्च न्यायालयाच्या या आदेशाची संभावना न्या. ओक ‘अगदी विचित्र’ (एक्स्ट्रीमली स्ट्रेंज) या विशेषणाने करतात. सर्वोच्च न्यायालयालाच आपल्या नियंत्रणाखालील उच्च न्यायालयाचे वर्तन ‘अगदी विचित्र’ वाटत असेल तर सामान्यांच्या न्यायाधीशांबाबतच्या भावना काय असतील हे समजून घेणे अवघड नाही. अलीकडे काही उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांवर कडकडीत आसूड ओढण्याची वेळ सर्वोच्च न्यायालयावर वारंवार येताना दिसते. गुजरात, पाटणा ही यातील काही उदाहरणे. आपणच ज्याचे नियंत्रण करतो त्या काही उच्च न्यायालयातील काही न्यायाधीशांची बौद्धिक कमअस्सलता सर्वोच्च न्यायालयास खरोखरच टोचू लागली असेल तर त्यातून परिस्थितीत काही सुधारणा होण्याची शक्यता निर्माण तरी होते.

एरवी आपले कसे उत्तम सुरू आहे याची टिमकी स्वत:च वाजवणाऱ्यांची कमतरता आपल्याकडे नाही.सर्वोच्च न्यायालयाची दुसरी कौतुकास पात्र कृती ही अलीकडे सत्ताधीशांस प्राणप्रिय अशा ‘ईडी’ या यंत्रणेविषयी आहे. ही यंत्रणा म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या राजकीय लढाईतील जणू ब्रह्मास्त्रच. पूर्वी ही जबाबदारी ‘सीबीआय’ या यंत्रणेवर असे. पण या यंत्रणेस रोखण्याचा अधिकार राज्यांस आहे हे लक्षात आल्यावर ‘ईडी’त प्राण फुंकले गेले. तोवर विरोधी बाकांवर असताना ‘सीबीआय’च्या दुरुपयोगाविरोधात कंठशोष करणारे सत्तेवर आले की ‘आधीचे बरे’ असे म्हणण्याची वेळ कशी आणतात, हे दिसून आले होते. अलीकडे सीबीआयच्या जोडीने आपल्यासमोर नतमस्तक होण्यास विरोध करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याच्या कामी ‘ईडी’ही जुंपली जाते असा आरोप विरोधक वरचेवर करतात. त्यात तथ्य नाही हे मानणे अवघड. या आरोपांची दखल घेण्याची सजगता सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा दाखवली आणि ‘ईडी’चे वस्त्रहरण केले. कानात वारे गेल्यासारखे वागणाऱ्या या यंत्रणेस वेसण घालण्याची गरज होतीच. सर्वोच्च न्यायालयाचे ताजे भाष्य काही प्रमाणात का असेना ती पूर्ण करते.

मुद्दा होता दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनाचा. त्यांना जामीन देण्यास अर्थातच ‘ईडी’चा विरोध आहे आणि त्यांच्यावर झालेली कारवाई ही पूर्णपणे नियमाधारित आणि न्याय्य आहे असे या यंत्रणेचे म्हणणे आहे. या आरोपांची सत्यासत्यता तपासण्याआधी न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपंकर दत्ता यांच्या पीठाने केजरीवाल यांस जामीन द्यावा की न द्यावा यावर सविस्तर भाष्य केले, ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. ‘संशय’ आणि ‘खात्री’ यावर न्या. खन्ना ‘ईडी’स धारेवर धरतात आणि ‘न्याय्य कारवाई’ आणि ‘अधिकाऱ्यांची मनमानी’ यातील भेदही स्पष्ट करतात. कोणत्याही कारवाईची सुरुवात संशयावरून होत असली तरी केवळ संशय हा कारवाईसाठी पुरेसा ठरत नाही. भ्रष्टाचाराच्या संशयासाठी एखाद्यास अटक करण्याची गरज ‘ईडी’स वाटत असली तरी या अटकेच्या गरजेची न्यायिक पूर्तता होऊ शकेल असा पुरावा या यंत्रणेच्या हाती आहे का, हा न्या. खन्ना यांचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो आणि त्याच्या उत्तरातून बऱ्याचदा ‘ईडी’ची कारवाई ही अधिकाऱ्यांची मनमानी असते हेही स्पष्ट होते. एखाद्याविरोधात अटकेची कारवाई करताना अधिकारीगण स्वत:स ‘सोयीस्कर, हवा तितकाच तपशील’ निवडू शकत नाहीत, इतक्या स्पष्टपणे न्यायाधीश ‘ईडी’स बजावतात. ते येथेच थांबत नाही ‘‘एखाद्याची चौकशी करण्याची गरज आहे

याचा अर्थ त्या व्यक्तीस अटक करण्याची आवश्यकता आहे असा असू शकत नाही’’ असे स्पष्ट करताना न्यायाधीश ‘ईडी’स तुम्ही भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपींस समान नियम लावता का असे विचारतात आणि त्यासाठी तपशीलही देतात. गेल्या वर्षात, म्हणजे २०२३ साली ‘ईडी’ने ५९०६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले. तथापि त्यापैकी फक्त ५३१ जणांचे घर आदींची झडती घेतली गेली आणि ५१३ जणांना प्रत्यक्ष अटक झाली. या संदर्भातील साद्यांत तपशील न्या. खन्ना यांनी सादर केला आणि ‘ईडी’ सर्वांना समान न्यायाने वागवते का असाही प्रश्न उपस्थित केला. त्याचे उत्तर नकारार्थी आहे हे सूचित होते. कारवाईमागील सापेक्षता आणि वस्तुनिष्ठता या संदर्भात न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्दे यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करणारे आहेत. यातील काही मुद्दे

# धगडवाडी (भट फार्म) येथे वनमहोत्सव उत्साहात साजरा

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी
मंगेश यादव

रोहा तालुक्यातील धगडवाडी (भट फार्म) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी माँ प्रतिष्ठानच्या वतीने वनमहोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा भट, सिद्धार्थ भट, प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच वन अधिकारी, कर्मचारी व विभागातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.गेली कित्येक वर्षे गोशाळा परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे.त्याच अनुषंगाने याही वर्षी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरा करण्यात आला असल्याची माहिती प्रतिष्ठानचे वतीने देण्यात आली आहे.दिवसेंदिवस पृथ्वीचे वाढत चाललेले तापमान व ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम पाहता वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे.तर निसर्गाला आपण वाचविले तर निसर्ग आपल्याला वाचवेल अशाप्रकारचे मनोगत अध्यक्ष कृष्णा भट यांनी व्यक्त केले .




मुख्यमंत्री वयोश्री योजनेची टाकेडे गावठाण येथे माहिती देताना ,शिवसेना महिला आघाडी तालुका संघटक सौ. अमिता शिंदे श्री. अनंत शिंदे गुरुजी आणि मिलींद जाधव या मार्गदर्शन कार्यक्रमासाठी विषेश उपस्थिती ग्रामविकास मंडळ टाकेडेचे अध्यक्ष श्री. सिताराम सुर्वे .ङ्गउत्कर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. प्रियांका साळुखे

अंगणवाडी सेवीका सौ. अमिता गणवे शिवसेना शाखा प्रमुख श्री. अनिल गणवे

उपशाखा प्रमुख श्रीराम शिरवणक

महिला आघाडी शिवसेना उपशाखा प्रमुख अपर्णा चव्हाण व बहुसंख्य ग्रामस्थ आणि महिला उपस्थीत होत्या.....

# ग्रँड रोड स्टेशन परिसरातील इमारतीचा भाग कोसळला, एकाचा मृत्यू






मुंबईतील ग्रँड रोड स्टेशन परिसरातील चार मधली इमारतीचा काही भाग कोसळला आहे. रुबूनिसा मंजिल असं इमारतीचं नाव आहे. या दुर्घटनेनंतर काही जण आतमध्ये अडकले होते. मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी व फायर ब्रिगेडच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून कर्मचाऱ्यांकडून रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. त्यामध्ये चौघे जण जखमी झाले होते. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.-(राजेश बाष्टे अलिबाग)

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २१ जुलै २०२४ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## रायगड जिल्हा आदर्श शाळा नवघर येथे आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा संपन्न

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/ मंगेश यादव

सालाबादप्रमाणे या वर्षीही रा. जि. प . नवघर शाळेत आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले.१६ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता शाळेच्या प्रांगणातून विठ्ठल रखुमाई आणि वारकरी विद्यार्थी विद्यार्थिनीं व पालकांसोबत दिंडी सुरु करण्यात आली.संपूर्ण गावातून ज्ञानोबा तुकाराम माऊली नामाचा गजर करत, भक्तीगीते म्हणत टाळ मृदूंग यांच्या आवाजाने संपूर्ण गावात भक्तीमय वातावरणात दिंडी संपन्न झाली




इयत्ता ३ री विद्यार्थी वल्लभ सुतार व १ ली मधील विद्यार्थिनी सिद्धी तोंडे यांनी विठ्ठल रखुमाईची सुंदर वेशभूषा साकारली होती. इतर विद्यार्थीही संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मीराबाई, संत जनाबाई इत्यादी संतांच्या वेशभूषा करून आले होते.इयत्ता ८ वी मधील विद्यार्थ्यांनी टाकाऊ साहित्यापासून दिंडी साठी सुंदर पालखी तयार करून फुलांनी सुशोभित केली होती.तसेच ८ वी तील विद्यार्थिनींनी सुंदर रांगोळी काढत कार्यक्रमाची शोभा वाढवली.विद्यार्थिनींनी रंगीबेरंगी साड्या परिधान करून डोक्यावर तुळसी वृंदावन घेत विठू नामाचा गजर करत दिंडीत चैतन्य व उत्साहाचे वातावरण निर्माण केले. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना खाऊ देऊन तसेच नवघर चे उपसरपंच संजय मोरे, सदस्य नामदेव लांगी, दिनानाथ मालुसरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

हा दिंडीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक प्रमोद म्हात्रे, संगीता बैकर, वृषाली गुरव, शीतल पाटील, अनुजा माने, अंकिता जाधव, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व पालक यांचा मोलाचा सहभाग लाभला. शाळेचे मुख्याध्यापक अनिल राणे यांनी सर्वांचे आभार मानत दिंडीची सांगता करण्यात आली.

## कर्जत महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारा विरोधात मुक मोर्चा

कर्जत (जयेश जाधव)कर्जत महावितरण कंपनीच्या भोंगळ कारभारा विरोधात भिसेंगाव महावितरण कंपनीच्या कार्यालयावर कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीच्या वतीने मुक मोर्चा काढण्यात आला. यामध्ये कर्जतमधील नागरिक महिला, विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते .ङ्ग कर्जत शहरातील मुख्य बाजारपेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ एकत्र जमून मोर्चाला सुरुवात करण्यात आली त्यानंतर बाजारपेठेतून डेक्कन जिमखाना येथपर्यंत मोर्चा काढण्यात आला त्यानंतर मोर्चातील एक शिष्टमंडळ तयार करून कर्जत रेल्वे स्टेशन पलीकडे भिसेगाव येथील विद्यूत महावितरण कार्यालयात जाऊन आपल्या विविध मागण्यांचे निवेदन महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले.सदर मोर्चात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.




## महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने १५ जुलै कबड्डी महर्षी शंकरराव उर्फ बुवा साळवी जन्मदिवस कबड्डी दिन साजरा

मंडणगड प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने १५ जुलै कबड्डी महर्षी शंकरराव उर्फ बुवा साळवी जन्मदिवस कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येत. आपल्या रत्नागिरी जिल्ह्यातील व आपल्या मंडणगड तालुक्याचे मंडणगड तालुका कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. शरद रामचंद्र महाडीक यांना १५ जुलै२०२४ कबड्डी महर्षी शंकरराव उर्फ बुवा साळवी जन्मदिवस कबड्डी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने प्रती वर्षी देण्यात येणार जेष्ठ प्रशिक्षक पुरस्कार श्री. शरद रामचंद्र महाडीक (राष्ट्रीय प्रशिक्षक) यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने देण्यात आला.आज दि २० जुलै रोजी शिवसेना मंडणगड तालुक्याच्या वतीने शिवसेना तालुका प्रमुख प्रतापजी घोसाळकर यांनी शरद दादा महाडिक यांचे अभिनंदन केले. विभाग प्रमुख संजयजी शेडगे शहरप्रमुख गटनेता विनोदजी जाधव उपशहर प्रमुख निलेशजी गोवळे सचिव सिध्देश देशपांडे भरत कोंबेकर उपस्थित होते..



## नेने महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे:

पेण:-दि. २० जुलै २०२४ रोजी पेणच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना युनिट तर्फे कॉलेजच्या क्रीडांगणाच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.






या कार्यक्रमाचे उद्घाटन कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सौ. मेनन मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. श्री. तुकाराम माळवे सर, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक डॉ. श्री.सुभाष लकडे सर तसेच वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका व कार्यक्रम समन्वयक महिला कार्यक्रम अधिकारी सौ. सायली पितळे मॅडम आणि सौ.वैदेही जोशी मॅडम यांनी केले. याप्रसंगी, भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या क्रीडांगणाच्या परिसरात विविध प्रकारचे फळझाडे तसेच इतर वृक्ष लावण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना पर्यावरण समतोल, तसेच वृक्षारोपण व संवर्धन याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकी जपत हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पोफळी प्राथमिक शाळेत विविध समित्यांच्या कार्यकारिणीची निवड

परशुराम एज्युकेशन सोसायटी संचालित प्राथमिक शाळा पोफळी येथे पालक-शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समिती कार्यकारिणी स्थापन करण्यात आली.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.महेंद्र कापडी सर यांच्या उपस्थितीत पालक-शिक्षक संघ कार्यकारिणी व शाळा व्यवस्थापन समिती कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारिणी उपाध्यक्षा सौ. सपना सुनील थोरवडे तर शाळा व्यवस्थापन समिती कार्यकारणीचे उपाध्यक्ष म्हणून पोफळी ग्रामपंचायत सदस्य तसेच विशेष कार्यकारी अधिकारी श्री.वैभवजी दिलीप पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या सभेत वर्षभरातील शालेय कामकाजाचा आराखडा तयार करण्यात आला. व शालेय विकासाचे मुद्दे ठरविण्यात आले.मुख्याध्यापक श्री महेंद्र कापडी सर यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.



**रिलायन्स चौक ते नागोठणे वाहतूक बंद**

**रायगड जिल्ह्यात सकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. पावसामुळे आंबा नदीची पाण्याची पातळी वाढून नागोठणे गावात रस्त्यावर पाणी आले आहे. त्यामुळे रिलायन्स चौक ते नागोठणे वाहतूक बंद करण्यात आली आहे. वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात आले असून नागरिकांना सतर्कते बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.(राजेश बाष्टे अलिबाग)**

## गुहागर तालुका आरोग्य विभागातर्फे पाटपन्हाळे विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गौरव..!

### ( समृद्धी आंबेकर तालुका स्तरीय प्रथम तर मानसी पालकर द्वितीय )

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुका आरोग्य विभागातर्फे स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत गुहागर तालुकास्तरीय निबंध स्पर्धा संपन्न झाली होती . सदर तालुकास्तरीय स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयाच्या विद्यार्थिनी कु.समृद्धी सुरेश आंबेकर हिने प्रथम क्रमांक व कु. मानसी संदीप पालकर हिने द्वितीय क्रमांक संपादन केला. गुहागर तालुकास्तरीय स्पर्धेतील पाटपन्हाळे विद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींचा गुहागर पंचायत समिती सभागृहात रत्नागिरी जिल्हा आरोग्य अधिकारी व गुहागर तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र , गुलाबपुष्प व रोख रक्कम देऊन नुकताच गौरव समारंभ संपन्न झाला





गुहागर तालुका आरोग्य विभागातर्फे संपन्न झालेल्या स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत गुहागर तालुकास्तरीय निबंध स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गौरव समारंभासाठी रत्नागिरी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये , अतिरिक्त रत्नागिरी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र गावडे , गुहागर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.घनश्याम जांगीड व कर्मचारी उपस्थितीत होते. पाटपन्हाळे विद्यालयाच्या समृद्धी सुरेश आंबेकर व मानसी संदीप पालकर या विद्यार्थिनींचा मान्यवर अधिका-यांच्या हस्ते प्रमाणपत्र , गुलाबपुष्प व रोख रक्कम प्रदान करून गौरव करण्यात आला.

कु. समृद्धी सुरेश आंबेकर हिने गुहागर तालुकास्तरीय प्रथम क्रमांक व मानसी संदीप पालकर हिने द्वितीय क्रमांक संपादन केल्याबद्दल न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे विद्यालयातर्फे प्राचार्य व्ही.डी.पाटील , ज्येष्ठ प्रा.जी.डी. नेरले , माध्यमिक सांस्कृतिक विभाग प्रमुख व ज्येष्ठ शिक्षिका सौ.एस.एस.चव्हाण , शिक्षक एस.एस.घाणेकर , एस.एम.आंबेकर यांच्या उपस्थितीत पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादक: गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )